# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र. ०३ वॉर्ड क्रं. १६ येथील आसबीबी येथे भिवंडी मनपा शाळा क्र. ६५ करिता वर्ग खोल्या बांधणेसह शौचालय व शालेय साहित्य पुरविणे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र. ०३ वॉर्ड क्रं. १६ येथील आसबीबी येथे भिवंडी मनपा शाळा क्र. ६५ करिता वर्ग खोल्या बांधणेसह शौचालय व शालेय साहित्य पुरविणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५९,९७,३४३/-) या कामाची बी-१ प्रकारची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १२९/२०२३-२४ (ऑनलाईन टेंडर क्र. ९७४३५८) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. सदर कामासाठी एकुण पात्र ०२ निविदांपैकी **मे. मानसी कन्स्ट्रक्शन, मुंबई.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६०% दराने कमी असुन त्यानुसार कामाची रक्कम रु. ५९,६१,३५९/- (**GST** सह) येत आहे.

**मे. मानसी कन्स्ट्रक्शन, मुंबई.** यांची प्राकलन दरापेक्षा ०.६०% कमी दराची निविदा रक्कम रु. ५९,६१,३५९/- (अक्षरी रु. एकोणसाठ लाख एकसष्ट हजार तिनशे एकोणसाठ रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ०५/०२/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दिनांक :-22/02/२०२४

ठराव क्रं. : 369

**भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र. ०३ वॉर्ड क्रं. १६ येथील आसबीबी येथे भिवंडी मनपा शाळा क्र. ६५ करिता वर्ग खोल्या बांधणेसह शौचालय व शालेय साहित्य पुरविणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. मानसी कन्स्ट्रक्शन, मुंबई.** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.६०% कमी दराची म्हणजेच रक्कम रु. ५९,६१,३५९/- (अक्षरी रु. एकोणसाठ लाख एकसष्ट हजार तिनशे एकोणसाठ रुपये रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, **भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र. ०३ वॉर्ड क्रं. १६ येथील आसबीबी येथे भिवंडी मनपा शाळा क्र. ६५ करिता वर्ग खोल्या बांधणेसह शौचालय व शालेय साहित्य पुरविणे.** याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. मानसी कन्स्ट्रक्शन, मुंबई.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापना कामी प्रभाग समिती निहाय आवश्यक वाहने भाडेतत्वावर घेणे कामी सहा महिन्याच्या होणा-या सुधारित खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

मे.सविनय सादर,

घनकचरा व्यवस्थापन ठेकेदार मे.आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई या ठेकेदार संस्थेचे घनकचरा व्यवस्थापन कामाचे माहे सप्टेंबर २०२३ चे रु.१,८५,५५,६३९/- इतके देयक प्रस्तावित करण्यात आले असुन माहे ऑक्टोबर २०२३, माहे नोव्हेंबर २०२३ व माहे डिसेंबर २०२३ चे देयक अदा करणेचे बाकी असुन ठेकेदारा मार्फत दरमहा अंदाजे १.५० कोटी ते २ कोटी पर्यंत मासिक देयक सादर केले जातात.उक्त ठेकेदार यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने आरोग्य विभागा मार्फत जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/ १६०४,दि.११/१२/२०२३ रोजी ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली असुन ठेकेदाराच्या कामात सुधारणा आढळुन येत नसल्याने माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणुक आचारसहिंता लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने व ठेकेदार यांचे कामात सुधारणा होत नसल्याने स्थानिक नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल. याकरिता मनपा मालकीच्या घंटागाडी व आर.सी. गाडी यांचा वापर करुन मनपाच्या वाहन विभागाकडील मंजुर दरानुसार, मंजुर ठेकेदाराकडुन ड्रायव्हर उपलब्ध करुन मनपा मार्फत इंधन पुरवठा करुन कचरा संकलनाचे काम करणेचे व अतिरिक्त वाहने आवश्यतेनुसार मासिक भाड्याने घेवुन त्याआधारे काम पुर्ण करणेसाठी यापुर्वी विभागाने प्रस्तावित केलेल्या खर्च रक्कम रु.१,४७,०७,५०९/- इतक्या खर्चास व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुनर्विनियोजनास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी प्रशासकिय ठराव क्र.३३० दि.१९/०१/२०२४ नुसार मंजूरी प्राप्त झाली होती.

परंतु भाडेत्वावर घेण्यात आलेल्या वाहनांवर मनपाच्या आस्थापनावर कार्यरत असलेले सफाई कर्मचारी घेण्यात आले होते. प्राप्त निर्देशानुसार आस्थापनेवरील सफाई कर्मचारी भाडेतत्वावर वाहनावर घेतल्यास शहरातील स्वच्छता विषयक कामावर परिणाम होणार असल्याने याकामी मनपाच्या आस्थापनेवरील सफाई कर्मचारी न घेता मेहनताना तत्वावर मजुर घेणचे सुचना प्राप्त झाले होते. त्यानुसार प्रभाग समिती निहाय सादर करण्यात आला सुधारित खर्चास प्रशासकीय ठराव क्र.३४८२ दि.०९/०२/२०२४ नुसार मंजुरी प्राप्त झाली होती.

दि.२०/२/२०२४ रोजी झालेल्या निविदा पूर्वक बैठकीच्या अनुषंगाने मा.आयुक्त सो, मा.अतिरिक्त आयुक्त सो, मा.उप-आयुक्त (आरोग्य) सो यांनी दिलेल्या निर्देशानुसार घनकचरा संकलन व वहन करीता प्रसिध्द झालेली निविदा क्रं.१६,१७,१८,१९ व २० ही निविदा रद्द करून सुधारित खर्च प्रस्तावित करण्याचे निर्देश दिले असून ते खालील प्रमाणे सुधारित खर्च प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रभाग समिती क्रं.१

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | दर | प्रति दिन | वाहनाचा मासिक खर्च |
| **घंटागाडी ९** | 2572.50 | 23152.5 | 694575 |
| **टिप्पर (डंपर) संख्या ४ (६ तास)** | 6867 | 27,468 | 824040 |
| **जेसीबी २ (८ तास)** | 10684.8 | 21370.0 | 641088 |
| **मजूर ३३** | 28311 | 0 | 934263 |
| | | 71991 | 3093966 |

प्रभाग समिती क्रं.२

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | दर | प्रति दिन | वाहनाचा मासिक खर्च |
| **घंटागाडी ९** | 2572.50 | 23152.5 | 694575 |
| **टिप्पर (डंपर) संख्या ४ (६ तास)** | 6867 | 27468 | 824040 |
| **जेसीबी २ (८ तास)** | 10684.8 | 21370.0 | 641088 |
| **ट्रक्टर टॉली १** | 3343.2 | 3343.2 | 100296 |
| **मजूर ३५** | 28311 | 0 | 990885 |
| | | 75334 | 3250884 |

प्रभाग समिती क्रं.३

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | दर | प्रति दिन | वाहनाचा मासिक खर्च |
| घंटागाडी ९ | 2572.50 | 23152.5 | 694575 |
| टिप्पर (डंपर) संख्या ४ (६ तास) | 6867 | 27468 | 824040 |
| जेसीबी २ (८ तास) | 10684.8 | 21370.0 | 641088 |
| मजूर ३३ | 28311 | 0 | 934263 |
| | | 71,991 | 3093966 |

प्रभाग समिती क्रं.४

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | दर | प्रति दिन | वाहनाचा मासिक खर्च |
| घंटागाडी ९ | 2572.50 | 23152.5 | 694575 |
| टिप्पर (डंपर) संख्या ४ (६ तास) | 6867 | 27468 | 824040 |
| जेसीबी २ (८ तास) | 10684.8 | 21,370.0 | 641088 |
| मजूर ३१ | 28311 | 0 | 877641 |
| | | 71991 | 3037344 |

प्रभाग समिती क्रं.५

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर | | | |
|---|---|---|---|
| घंटागाडी - ९ | 2572.50 | 23152.5 | 694575 |
| टिप्पर (डंपर) - ४ (६ तास) | 6,867 | 27468 | 8,24,040 |
| जेसीबी -२ (८ तास) | 10684.8 | 21370.0 | 641088 |
| ट्रक्टर टॉली - १ | 3343.2 | 3343.2 | 100296 |
| मजूर -३३ | 28311 | 0 | 934263 |
| | | 75,334 | 3194262 |

➢ मनपाच्या वाहनांसाठी वाहन चालक, इंधन व मजूर व भाडेतत्तावर घेण्या येणाऱ्या साधन साम्रुगी साठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूरासाठी प्रभाग समिती निहाय येणाऱ्या मासिक खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| प्रभाग समिती क्र. | मनपाच्या वाहनांचा व वाहनचालक व इंधनाचा मासिक खर्च | सुधारित भाडेतत्वावरील वाहनांचा व मजूरांचा मासिक खर्च | सुधारित एकुण खर्च |
|---|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.१ | 1033248 | 3093966 | 4127214 |
| प्रभाग समिती क्र.२ | 787702 | 3250884 | 4038586 |
| प्रभाग समिती क्र.३ | 787702 | 3093966 | 3881668 |
| प्रभाग समिती क्र.४ | 726394 | 3037344 | 3763738 |
| प्रभाग समिती क्र.५ | 971940 | 3194262 | 4166202 |
| प्रभाग समिती क्र.१ ते ५ साठी १० राखीव वाहन चालकांचा खर्च | 239060 | 0 | 239060 |
| एकुण खर्च | 4546046/- | 15670422/- | 20216468/- |

वरिल तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता यापुर्वी विभागाने प्रस्तावित केलेली मासिक खर्च रक्कम रु.१,८२,३७,०२४/- एवढा व सुधारीत मासिक खर्च रक्कम रु.२,०२,१६,४६८/- इतका येत असल्याने रु.१९,७९,४४६/- इतक्या खर्चात वाढ झाली आहे.

सुधारित रक्कम रु.२,०२,१६,४६८/- होणारा खर्च हा सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी पुर्नविनियोजनास दिलेल्या मंजुरी मधुन प्रस्तावित करण्यात येत असुन सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापना कामी मंजुर असलेल्या तरतुद निधी मधुन उर्वरित खर्च करणेचे असल्याने एकुण ६ महिन्याच्या कालावधी किंवा नविन निविदा अंतिम होईपर्यत मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी.

प्रशासकिय ठराव क्र. ३७२ दि. २२/ ०२ /२०२४

घनकचरा व्यवस्थापना कामी मे.आर.ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने मनपाकडुन दिलेल्या अंतीम नोटीसचा कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा सादर न केल्याने संबंधितांस बजावण्यात आलेल्या नोटीस मधील नमुद कालावधी संपुष्टात आले नंतर मे.आर. ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे सोबत झालेला करारनामा रद्द करुन अत्यंत तातडीचे व निकडीची बाब म्हणुन मनपाची मालकीची वाहने उक्त वाहनांवर वाहनविभागाकडील मंजुर निविदे प्रमाणे वाहनचालक व इंधन घेणे. तसेच अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने व मजुर भाडेतत्वावर घेणेसाठी दरमहा रु.१,८२,३७,०२४/- इतक्या खर्च व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुनर्विनियोजनास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी प्रशासकिय ठराव क्र.३४८, दि.०९/०२/२०२४ नुसार मंजूरी प्राप्त झाली होती. त्यानुसार सुधारित रक्कम रु.२,०२,१६,४६८/- इतका असल्याने यापुर्वी पुनर्विनियोजन मधुन खर्चास मान्यतेस त्याच प्रमाणे नविन निविदा अंतीम होईपर्यत प्रभाग समिती निहाय निविदा मागविणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापना कामी मे.आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने व मनपा कडुन दिलेल्या अंतीम नोटीसचा कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा सादर न केल्याने संबंधितांस बजावण्यात आलेल्या अंतिम नोटीसचा ६० दिवसाचा कालावधी दि.०८/०२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने **दि.०८/०२/२०२४ रोजी मे. आर. ॲण्ड. बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई यांचे सोबत झालेल्या चर्चे अंती** दि.०१/०३/२०२४ रोजी पासुन **घनकचरा संकलन व वहन करणेचे काम बंद करणार असल्याने** अत्यंत तातडीचे व निकडीची बाब म्हणुन मनपा तर्फे पुरविण्यात आलेल्या मनपाची मालकीची वाहने उक्त वाहनांवर वाहन विभागाकडील मंजुर निविदे प्रमाणे आवश्यक संख्ये मध्ये वाहनचालक घेणे. तसेच अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने व मजुर भाडेतत्वावर घेणेसाठी अंदाजे सुधारित दरमहा रु.२,०२,१६,४६८/- एवढा खर्च येत असल्याने प्रभाग निहाय मासिक तत्वावर पुढील निविदा प्रक्रिया अंतिम होई पर्यंत अथवा पर्यायी व्यवस्था होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत तसेच आवश्यकते नुसार बदल करणे कामी अधिकार राखुन ठेवुन दरमहा येणा-या खर्चास व उक्त कामा करिता सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुनर्विनियोजन मधुन तसेच पुढील खर्च सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापना कामी मंजुर असलेल्या तरतुद निधी मधुन उर्वरित खर्च करणे **यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेत येत आहे.**

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

ok

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय — नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा◌ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.०५/०१/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. ०५/०१/२०२४ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह तरतूद रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाले गटार मो-या बांधणे | रु. ५७०.६० लक्ष | रु.५७०.५८ लक्ष | रु.०.०२ लक्ष | (५००.००+७०.६० = ५७०.६० लक्ष) |
| | एकूण | रु. ५७०.६० लक्ष | रु.५७०.५८ लक्ष | रु.०.०२ लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. प्रभाग क्र.५ च्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी सी.सी गटर बनविणे बाबतचे काम जा.क्र/भिनिशमनपा/बांध/३५९० दि.२२/१०/२०२१ नुसार कार्यादेश देवून विहीत मुदतीत पुर्ण केलेले आहे. सदरचे काम हे प्रगतीपथावरील होते मात्र, सन २०२३-२४ च्या यादी मध्ये नाव न आल्यामुळे तरतूद करता आलेली नाही. तरी ठेकेदार यांना देयक अदा करणेकामी पुनर्विनियोजन करणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंतिम देयक रु.९,०१,४००/- इतक्या रक्कमेचे आहे. मात्र नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे इतर लेखाशिर्षकामधून पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करावा लागणार आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण" या लेखाशिर्षामधुन रु. ९,०२०००/- लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्रमांक ०५ च्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणांची गटारे बांधणेबाबत. | रु. ९.०२/- लक्ष | |
| एकूण | रु. ९.०२/- लक्ष | |

खालील लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. ०५/०१/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुर्नविनियोजनाच्या रक्कमेसह | दि. ०५/०१/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम | पुर्नविनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण | रु.५०.०० लक्ष | रु.३५.०० लक्ष | रु.१५.०० लक्ष | रु.९.०२ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा.ो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्रभाग समिती क्रमांक ०५ च्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणांची गटारे बांधणेबाबत. विषयांकित काम पुर्ण झाले असून प्रगतीपथावरील कामांच्या यादी मध्ये नाव न आल्यामुळे निधी अभावी ठेकेदार यांचे देयक अदा करता आले नाही, म्हणून सदर कामाकरीता पुर्नविनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.५ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये "व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण " या लेखाशिर्षामधून रु.९.०२ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.

त्यास दिनांक 23 / 02 /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. 303

दिनांक 26 /02 /२०२४

प्रभाग समिती क्रमांक ०५ च्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणांची गटारे बांधणेबाबतचे जा.क्र/भिनिशमनपा/बांध/३५९० दि.२२/१०/२०२१ नुसार कार्यादेश देवून विहीत मुदतीत पुर्ण केलेले आहे. सदरचे काम हे प्रगतीपथावरील होते मात्र, सन २०२३-२४ च्या यादी मध्ये नाव न आल्यामुळे तरतूद करता आलेली नाही. देयक अदा करणे गरजेचे असल्याने नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण" या लेखाशिर्षामधून एकूण रु.९.०२ लक्ष रुपयाचे नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**खालील लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करावयाचे आहे.**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. १८/१२/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुर्नविनियोजनाच्या रक्कमेसह | दि. १८/१२/२०२३ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम | पुर्नविनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिक्रमण तोडफोड उपकरण खरेदी व इतर खर्च | रु.५०.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु.५०.०० लक्ष | रु.३४.५४ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा.ो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्रभाग समिती.क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. विषयांकित कामाकरीता निधीचे पुर्नविनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.५ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने सांस्कृतिक सभागृह निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये "अतिक्रमण तोडफोड उपकरण खरेदी व इतर खर्च " या लेखाशिर्षामधून रु.३४.५४ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.

त्यास दिनांक २ / १ /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** 308 **दिनांक** 26/02/२०२४

प्रभाग समिती.क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. सदर ठिकाणी बुबेरे सांस्कृतिक केंद्रावरील पहिल्या मजल्यावरील स्लॅबमधून पाणि गळती होत असल्याने पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटीचे काम करणे गरजेचे आहे. मात्र विषयांकित काम करणेकरीता सांस्कृतिक सभागृह निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "अतिक्रमण तोडफोड उपकरण खरेदी व इतर खर्च " या लेखाशिर्षामधून एकूण रु.३४.५४ लक्ष रुपयाचे नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय – सांस्कृतिक सभागृह निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता चालू वर्षाकरीता करणेत आलेली तरतूद | दि.१८/१२/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. १८/१२/२०२३ पर्यंतची शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांस्कृतिक सभागृह निगा व दुरुस्ती | रु. ५०.०० लक्ष | रु.४९.९६ लक्ष | रु.०.०४ लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील सांस्कृतिक सभागृह निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये प्रगतीपथावरील कामाकरीता रु.१४.९३ लक्ष व सन २०२३-२४ करीता ५०.०० लक्ष असे एकूण रु.६४.९३ लक्ष तरतूद करणेत आलेली आहे. त्यातील चालू वर्षाची तदतूद रु.४१००/- शिल्लक आहेत. या लेखाशिर्षामधील निधी संपलेला असल्यामुळे आहे. विषयांकित काम करणे गरजेचे असल्याने प्र.स.क्र.५ मधील बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी काम करणे गरजेचे असल्याने कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु. ३४,५४,२९५/-इतका आहे. मात्र सांस्कृतिक सभागृह निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे अतिक्रमण विभागाकडील लेखाशिर्षकामधून पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करणे बाबत सह.नियंत्रण अधिकारी (अ.बा.व अति.नि.विभाग) यांनी मौखिक सांगितले आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "अतिक्रमण तोडफोड उपकरण खरेदी व इतर खर्च" या लेखाशिर्षामधुन रु. ३४.५४/- लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती.क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. | रु. ३४,५४,२९५/- | |
| एकूण | रु. ३४,५४,२९५/- | |

**प्रस्तावनाः- सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ करिता स्वच्छता विषयक कामासाठी आवश्यक असलेले जंतुनाशक, दुर्गधीनाशक,अळीनाशक व डासनाशक उपलब्ध होणे कामी प्राप्त झालेल्या निविदाकारास व सादर केलेल्या दरास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

मे.सविनय सादर,

स्वच्छता विषयक कामासाठी लागणारे जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध होणे कामी विभागा मार्फत प्रस्तावित केलेला खर्च रक्कम रु.१,२३,४३,९५०/-इतक्या रक्कमेस मा.आयुक्त सो. यांनी दि.२२/१२/२०२३ रोजी मान्यता दिली होती.त्यानुसार याकामी गट निहाय निविदा व उक्त कामाच्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी प्रस्तावित करण्यात आले असता मा.प्रशासक तथा आयुक्त ठराव क्र.३२५,दि.१६/०१/२०२४ अन्वये मंजुरी प्राप्त झाली.

तथापि याकामी पुढील कार्यवाही होणे करिता उत्पादक कंपनी किंवा पुरवठाधारक यांचेकडुन बाजारभावातील प्रति किलो व प्रति लिटरचे दर मागविणेसाठी दि.०५/१२/२०२३ ते दि.२५/०१/२०२४ या कालावधी निविदा प्रसिद्ध करण्यात आली असता दि.२९/०१/२०२४ रोजी उक्त कामास गट निहाय प्रत्येकी तीन निविदाकार यानी सहभाग घेतल्याचे दिसुन आले.त्यानुसार सहभागी झालेल्या निविदाकार यांनी निविदेच्या अटी शर्तीनुसार आवश्यक दस्तऐवजाची पुर्तता करणेसाठी मा.निविदा समिती समक्ष सादर करण्यात आले असता मा.निविदा समिती यांनी सादर केलेल्या दस्तऐवजाची पाहणी करुन लिफाफा क्र.२ (फायनानशिअल बीड) खुले करणेच्या सुचना केल्या असता खालील प्रमाणे गट निहाय प्रति किलो व लिटरचे दर सादर केले आहेत.

गट क्र.अ

| अ.क्र | कामाचा तपशील | मे.एस.आर.बी. इंडस्ट्रीज,सोलापुर | मे.परपेक्ट लॅबोरेटीज,सोलापुर | मे.हार्बोमिन रिसर्ज लॅबोटरीज,सोलापुर | सर्वात कमी दराचे निविदाकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | फिनोलीन सुपरफोर्ट लिक्विड | रु.२३४/- | रु.२४२/- | रु.२५४/- | मे.एस.आर.बी इंडस्ट्रीज, सोलापुर |
| २ | हार्बोडस्ट पावडर | रु.१३९/- | रु.१५२/- | रु.१६८/- | |
| ३ | सॅनिटोलीन लिक्विड | रु.३८७/- | रु.४१२/- | रु.४३८/- | |
| ४ | क्लीनॉल सुपर | रु.१७५/- | रु.१८२/- | रु.१९८/- | |
| ५ | सेप्टीक्लिन पावडर | रु.७००/- | रु.७१५/- | रु.७३८/- | |
| ६ | पेरिस स्प्रे | रु.३१८५/- | रु.३२४५/- | रु.३४२५/- | |

गट क्र.ब

| अ.क्र | कामाचा तपशील | मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेश,कल्याण | मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन, भिवंडी | मे.श्रीराम ॲग्रो ऐजन्सीज,अमरावती | सर्वात कमी दराचे निविदाकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | लाम्बंडा सायहैलोथ्रिन ९.७ टक्के सी.एस. | रु.३९००/- | रु.३७५०/- | रु.४०९५/- | अ.क्र.१,३,४,५, ७ व ८ करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन, भिवंडी |
| २ | करनीम ईसी | रु.१९६९/- | रु.१९८५/- | रु.१९९६/- | |
| ३ | नोवाल्युरॉन १० टक्के ई.सी. | रु.३९४९/- | रु.३९००/- | रु.४०४५/- | |
| ४ | पॉलिडाय मिथाईलसिलोक्सेन २ टक्के पीडीएमएस | रु.४८५/- | रु.४७९/- | रु.५०५/- | |
| ५ | निमटेक्स हर्बल लार्व्हीसाईड | रु.१३९०/- | रु.१२६९/- | रु.१३१३/- | अ.क्र.२ व ६ करिता मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेश, कल्याण |
| ६ | मॅलाथीऑन ९५ टक्के टेक्नी | रु.१६३९/- | रु.१६७७/- | रु.१७४०/- | |
| ७ | सायथ्रिऑन ५० टक्के ईसी (आय.एस.आय.मार्क) | रु.९००/- | रु.८८९/- | रु.९६५/- | |
| ८ | स्पेक्ट्रा १० टक्के एस.सी. | रु.२१७५/- | रु.२१००/- | रु.२२६०/- | |

गट क्र.क

| अ.क्र | कामाचा तपशील | मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेश,कल्याण | मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन, भिवंडी | मे.श्रीराम ॲग्रो ऐजन्सीज, अमरावती | सर्वात कमी दराचे निविदाकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲसिड | रु.१०७/- | रु.१२५/- | रु.११५/- | अ.क्र.१,७,८ व ९ साठी मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण |
| २ | लिकविड सोप | रु.२४२/- | रु.२५१/- | रु.२३०/- | अ.क्र.२,३,४,५ व ६ करिता मे.श्रीराम ॲग्रो एजन्सीज, अमरावती |
| ३ | काळेफिनेल(आर.डब्ल्यु.सी.५) | रु.१९८/- | रु.१९२/- | रु.१७५/- | |
| ४ | सफेद फिनेल | रु.९९/- | रु.९५/- | रु.९१/- | |
| ५ | ॲरोबीक कंपोस्ट पावडर | रु.७१५/- | रु.७२८/- | रु.६९०/- | |
| ६ | डांबर गोळ्या | रु.३९२/- | रु.४१७/- | रु.३८०/- | |
| ७ | MWT Power (नॅचरल सिलिकेट बेस पावडर) | रु.११५/- | रु.१२२/- | रु.१३४/- | |
| ८ | MWT Liquid (वेस्ट्रीट लिक्वीड) | रु.१४३९/- | रु.१४५०/- | रु.१४७६/- | |
| ९ | Floor Care MAC | रु.५२२/- | रु.५३१/- | रु.५४८/- | |

गट क्र.ड

| अ.क्र | कामाचा तपशील | मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेश,कल्याण | मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन, भिवंडी | मे.श्रीराम ॲग्रो ऐजन्सीज,अमरावती | सर्वात कमी दराचे निविदाकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | जर्मिटॉक्स डी.पी.(मोनोक्लोरो फिनॉल डस्टीग पावडर) | रु.९२/- | रु.८५/- | रु.९७/- | अ.क्र.१ व २ साठी मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन, भिवंडी |
| २ | जर्मिनिल लिक्वीड (मोनोक्लो फिनॉल विथ डी.सी.एम.एक्स. लिक्वीड) | रु.५३५/- | रु.५२७/- | रु.५५५/- | |
| ३ | ओडोट्रीट-ओसीपी (पावडर) | रु.३९०/- | रु.४०२/- | रु.४४२/- | अ.क्र.३व ४साठी मे.डॉल्फीन सेल्सकॉर्पोरेशन, कल्याण |
| ४ | व्हायरोटेक्स लिक्वीड | रु.१६३०/- | रु.१६७७/- | रु.१६५०/- | |

वरिल तौलोनिक तक्त्याचे अवलोकन असता प्रत्येक गट निहाय निविदेसाठी गट क्र.अ करिता मे.एस.आर.बी.इंडस्ट्रीज,सोलापुर,गट क्र.ब करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी व मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण,गट क्र.क करिता मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेश,कल्याण,मे.श्रीराम ॲग्रो एजन्सीज, अमरावती व गट क्र.ड करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी, मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण यांनी सर्वात कमी दर सादर केले असुन सादर केलेल्या प्रति लिटर व किलो नुसार व महानगरपालिकेच्या एकुण परिमाणानुसार सादर केलेल्या दरा नुसार खालील प्रमाणे गट निहाय खर्च येत आहे.

गट क्र.अ

| अ.क्र | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | मनपाचे अंदाजित दर | प्राप्त दरा मधील तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | फिनोलीन सुपरफोर्ट लिक्विड | रु.२३४/- | रु.२३४/- | ---- |
| २ | हार्बोडस्ट पावडर | रु.१३९/- | रु.१३९/- | ---- |
| ३ | सॅनिटोलीन लिक्विड | रु.३८७/- | रु.३८७/- | ---- |
| ४ | क्लीनॉल सुपर | रु.१७५/- | रु.१७५/- | ---- |
| ५ | सेप्टीक्लिन पावडर | रु.७००/- | रु.६८४/- | रु.१६/- ने जास्त |
| ६ | पेरिस स्प्रे | रु.३१८५/- | रु.३१८५/- | ---- |

गट क्र.ब

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | मनपाचे अंदाजित दर | प्राप्त दरा मधील तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | लाम्बंडा सायहैलोथ्रिन ९.७ टक्के सी.एस. | रु.३७५०/- | रु.४१५०/- | रु.४००/- ने कमी |
| २ | करनीम ईसी | रु.१९६९/- | रु.१९८०/- | रु.११/- ने कमी |
| ३ | नोवाल्युरॉन १० टक्के ई.सी. | रु.३९००/- | रु.४०००/- | रु.१००/- ने कमी |
| ४ | पॉलिडाय मिथाईलसिलोक्सेन २ टक्के पीडीएमएस | रु.४७९/- | रु.४८०/- | रु.१/- ने कमी |
| ५ | निमटेक्स हर्बल लार्व्हीसाईड | रु.१२६९/- | रु.१२७५/- | रु.६/- ने कमी |
| ६ | मॅलाथीऑन ९५ टक्के टेक्नी | रु.१६३९/- | रु.१६५०/- | रु.११/- ने कमी |
| ७ | सायथ्रिऑन ५० टक्के ईसी (आय.एस.आय.मार्क) | रु.८८९/- | रु.९००/- | रु.११/- ने कमी |
| ८ | स्पेक्ट्रा १० टक्के एस.सी. | रु.२१००/- | रु.२१००/- | ---- |

गट क्र.क

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | मनपाचे अंदाजित दर | प्राप्त दरा मधील तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | ॲसिड | रु.१०७/- | रु.११०/- | रु.३/- ने कमी |
| २ | लिकविड सोप | रु.२३०/- | रु.२३०/- | ---- |
| ३ | काळेफिनेल(आर.डब्ल्यु.सी.५) | रु.१७५/- | रु.१८०/- | रु.५/- ने कमी |
| ४ | सफेद फिनेल | रु.९१/- | रु.९३/- | रु.२/- ने कमी |
| ५ | ॲरोबीक कंपोस्ट पावडर | रु.६९०/- | रु.७००/- | रु.१०/- ने कमी |
| ६ | डांबर गोळ्या | रु.३८०/- | रु.३८५/- | रु.५/- ने कमी |
| ७ | MWT Power (नॅचरल सिलिकेट बेस पावडर) | रु.११५/- | रु.११५/- | ---- |
| ८ | MWT Liquid (वेस्ट्रीट लिक्वीड) | रु.१४३९/- | रु.१४५० | रु.११/- ने कमी |
| ९ | Floor Care MAC | रु.५२२/- | रु.५२५ | रु.३/- ने कमी |

गट क्र.ड

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | मनपाचे अंदाजित दर | प्राप्त दरा मधील तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | जर्मिटॉक्स डी.पी. (मोनोक्लोरो | रु.८५/- | रु.८५/- | ----- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | फिनॉल डस्टींग पावडर) | | | |
| २ | जर्मिनिल लिक्वीड (मोनोक्लो फिनॉल विथ डी.सी.एम.एक्स. लिक्वीड) | रु.५२७/- | रु.५३०/- | रु.३/- ने कमी |
| ३ | ओडोट्रीट-ओसीपी (पावडर) | रु.३९०/- | रु.४००/- | रु.१०/- ने कमी |
| ४ | व्हायरोटेक्स लिक्वीड | रु.१६३०/- | रु.१६५०/ | रु.२०/- ने कमी |

वरिल प्रमाणे प्राप्त निविदाकार यांनी सादर केलेल्या प्रति किलो व लिटरचे दर पाहाता मा.सहा-आयुक्त सो.(आरोग्य) यांनी संबंधितास वाटाघाटी करणेसाठी उपस्थिती राहणे कामी कळविण्यात आले असता प्राप्त गट निहाय ठेकेदार यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

गट क्र.अ

| अ.क्र | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | फिनोलीन सुपरफोर्ट लिक्विड | रु.२३४/- | रु.२२९/- | रु.५/- ने कमी |
| २ | हार्बोडस्ट पावडर | रु.१३९/- | रु.१३४/- | रु.५/- ने कमी |
| ३ | सॅनिटोलीन लिक्विड | रु.३८७/- | रु.३८२/- | रु.५/- ने कमी |
| ४ | क्लीनॉल सुपर | रु.१७५/- | रु.१७०/- | रु.५/- ने कमी |
| ५ | सेप्टीक्लिन पावडर | रु.७००/- | रु.६८२/- | रु.१८/- ने कमी |
| ६ | पेरिस स्प्रे | रु.३१८५/- | रु.३१५०/- | रु.३५/- ने कमी |

गट क्र.ब

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | लाम्बंडा सायहैलोथ्रिन ९.७ टक्के सी.एस. | रु.३७५०/- | रु.३७४५/- | रु.५/- ने कमी |
| २ | करनीम ईसी | रु.१९६९/- | रु.१९६०/- | रु.९/- ने कमी |
| ३ | नोवाल्युरॉन १० टक्के ई.सी. | रु.३९००/- | रु.३८९०/- | रु.१०/- ने कमी |
| ४ | पॉलिडाय मिथाईलसिलोक्सेन २ टक्के पीडीएमएस | रु.४७९/- | रु.४७७/- | रु.२/- ने कमी |
| ५ | निमटेक्स हर्बल लार्व्हीसाईड | रु.१२६९/- | रु.१२६०/- | रु.९/- ने कमी |
| ६ | मॅलाथीऑन ९५ टक्के टेक्नी | रु.१६३९/- | रु.१६३५/- | रु.४/- ने कमी |
| ७ | सायथ्रिऑन ५० टक्के ईसी (आय.एस.आय.मार्क) | रु.८८९/- | रु.८८५/- | रु.४/- ने कमी |
| ८ | स्पेक्ट्रा १० टक्के एस.सी. | रु.२१००/- | रु.२०८०/- | रु.२०/- ने कमी |

गट क्र.क

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | ॲसिड | रु.१०७/- | रु.१०२/- | रु.५/- ने कमी |
| २ | लिकविड सोप | रु.२३०/- | रु.२२५/- | रु.५/- ने कमी |
| ३ | काळेफिनेल(आर.डब्ल्यु.सी.५) | रु.१७५/- | रु.१७३/- | रु.२/- ने कमी |
| ४ | सफेद फिनेल | रु.९१/- | रु.९०/- | रु.१/- ने कमी |
| ५ | ॲरोबीक कंपोस्ट पावडर | रु.६९०/- | रु.६८५/- | रु.५/- ने कमी |
| ६ | डांबर गोळ्या | रु.३८०/- | रु.३७०/- | रु.१०/- ने कमी |
| ७ | MWT Power (नॅचरल सिलिकेट बेस पावडर) | रु.११५/- | रु.११३/- | रु.२/- ने कमी |
| ८ | MWT Liquid (वेस्ट्रीट लिक्वीड) | रु.१४३९/- | रु.१४३५/- | रु.४/- ने कमी |
| ९ | Floor Care MAC | रु.५२२/- | रु.५२०/- | रु.२/- ने कमी |

गट क्र.ड

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदे मधील कमी दर | वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | जर्मिटॉक्स डी.पी. (मोनोक्लोरो फिनॉल डस्टींग पावडर) | रु.८५/- | रु.८४/- | रु.१/- ने कमी |
| २ | जर्मिनिल लिक्वीड (मोनोक्लो फिनॉल विथ डी.सी.एम.एक्स. लिक्वीड) | रु.५२७/- | रु.५२५/- | रु.२/- ने कमी |
| ३ | ओडोट्रीट-ओसीपी (पावडर) | रु.३९०/- | रु.३८८/- | रु.२/- ने कमी |
| ४ | व्हायरोटेक्स लिक्वीड | रु.१६३०/- | रु.१६२५/- | रु.५/- ने कमी |

वरिल प्रमाणे निविदाकार यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दरा नुसार प्रति लिटर व किलोच्या दरानुसार व विभागाने प्रस्तावित एकुण परिमाणा प्रमाणे खालील प्रमाणे खर्च येत आहे.

गट क्र.अ

| अ. | कामाचा तपशील | आवश्यक परिमाण | दर प्रति लि./कि. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | फिनोलीन सुपरफोर्ट लिक्विड | १००० लि. | रु.२२९/- | रु.२,२९,०००/- |
| २ | हार्बोडस्ट पावडर | १०००० कि. | रु.१३४/- | रु.१३,४०,०००/- |
| ३ | सॅनिटोलीन लिक्विड | ५०० लि. | रु.३८२/- | रु.१,९१,०००/- |
| ४ | क्लीनॉल सुपर | १००० लि. | रु.१७०/- | रु.१,७०,०००/- |
| ५ | सेप्टीक्लिन पावडर | ५०० कि. | रु.६८२/- | रु.३,४१,०००/- |
| ६ | पेरिस स्प्रे | ७० लि. | रु.३१५०/- | रु.२,२०,५००/- |
| | | | | रु.२४,९१,५००/- |

गट क्र.ब

| अ.क्र | कामाचा तपशील | आवश्यक परिमाण | दर प्रति लि./कि. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | लाम्बंडा सायहैलोथ्रिन ९.७ टक्के सी.एस. | १०० लि. | रु.३७४५/- | रु.३,७४,५००/- |
| २ | करनीम ईसी | २०० कि. | रु.१९६०/- | रु.३,९२,०००/- |
| ३ | नोवाल्युरॉन १० टक्के ई.सी. | १०० लि. | रु.३८९०/- | रु.३,८९,०००/- |
| ४ | पॉलिडाय मिथाईलसिलोक्सेन २ टक्के पीडीएमएस | ३००० लि. | रु.४७७/- | रु.१४,३१,०००/- |
| ५ | निमटेक्स हर्बल लार्व्हीसाईड | ५०० लि. | रु.१२६०/- | रु.६,३०,०००/- |
| ६ | मॅलाथीऑन ९५ टक्के टेक्नी | ५०० लि. | रु.१६३५/- | रु.८,१७,५००/- |
| ७ | सायथ्रिऑन ५० टक्के ईसी (आय.एस.आय.मार्क) | २०० लि. | रु.८८५/- | रु.१,७७,०००/- |
| ८ | स्पेक्ट्रा १० टक्के एस.सी. | १०० लि. | रु.२०८०/- | रु.२,०८,०००/- |
| | | | | रु.४४,१९,०००/- |

गट क्र.क

| अ.क्र | कामाचा तपशील | आवश्यक परिमाण | दर प्रति लि./कि. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ॲसिड | ५०० लि. | रु.१०२/- | रु.५१,०००/- |
| २ | लिकविड सोप | ५०० लि. | रु.२२५/- | रु.१,१२,५००/- |
| ३ | काळेफिनेल(आर.डब्ल्यु.सी.५) | १५०० लि. | रु.१७३/- | रु.२,५९,५००/- |
| ४ | सफेद फिनेल | २००० लि. | रु.९०/- | रु.१,८०,०००/- |
| ५ | ॲरोबीक कंपोस्ट पावडर | ५०० कि. | रु.६८५/- | रु.३,४२,५००/- |
| ६ | डांबर गोळ्या | १००० कि. | रु.३७०/- | रु.३,७०,०००/- |
| ७ | MWT Power (नॅचरल सिलिकेट बेस पावडर) | २००० कि. | रु.११३/- | रु.२,२६,०००/- |
| ८ | MWT Liquid (वेस्ट्रीट लिक्वीड) | ३०० लि, | रु.१४३५/- | रु.४,३०,५००/- |
| ९ | Floor Care MAC | ५०० लि. | रु.५२०/- | रु.२,६०,०००/- |
| | | | | रु.२२,३२,०००/- |

गट क्र.ड

| अ.क्र | कामाचा तपशील | आवश्यक परिमाण | दर प्रति लि./कि. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जर्मिटॉक्स डी.पी. (मोनोक्लोरो फिनॉल डस्टींग पावडर) | १५,००० कि. | रु.८४/- | रु.१२,६०,०००/- |
| २ | जर्मिनिल लिक्वीड (मोनोक्लो फिनॉल विथ डी. सी. एम. एक्स. लिक्वीड) | ८०० लि. | रु.५२५/- | रु.४,२०,०००/- |
| ३ | ओडोट्रीट-ओसीपी (पावडर) | २००० कि. | रु.३८८/- | रु.७,७६,०००/- |
| ४ | व्हायरोटेक्स लिक्वीड | ३०० लि. | रु.१६२५/- | रु.४,८७,५००/- |
| | | | | रु.२९,४३,५००/- |

वरिल तपशील प्रमाणे प्रत्येक गट प्रति लिटर व किलो प्रमाणे सादर केलेल्या दरा नुसार व विभागाकडील सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षा करिता आवश्यक परिमाणा प्रमाणे खर्च येत असुन त्यानुसार खालील प्रमाणे गट निहाय एकुण खर्च व मनपाचा अदाजिंत खर्च मधील तफावत सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | गट क्र. | निविदे मधील प्राप्त दरानुसार एकुण खर्च | वाटाघाटी अंती एकुण खर्च | वाटाघाटी अंती एकुण तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | अ | रु.२५,५६,४५०/- | रु.२४,९१,५००/- | रु.६४९५०/- |
| २ | ब | रु.४४,३७,६००/- | रु.४४,१९,०००/- | रु.१८६००/- |
| ३ | क | रु.२२,६०,७००/- | रु.२२,३२,०००/- | रु.२८७००/- |
| ४ | ड | रु.२९,६५,६००/- | रु.२९,४३,५००/- | रु.२२१००/- |
| | | रु.१,२२,२०,३५०/- | रु.१,२०,८६,०००/- | रु.१,३४,३५०/- |

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षा करिता जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध होणे करिता निविदाकार यांनी वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरा प्रमाणे एकुण खर्च रु.१,२०,८६,०००/- इतका येत असुन यापुर्वी विभागा मार्फत जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध होणे कामी रु.१,२३,४३,९५०/- इतका खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.त्याप्रमाणे निविदाकार यांनी वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरा प्रमाणे एकुण रक्कम रु.२,५७,९५०/- इतका खर्च कमी येणार आहे.

सबब सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करिता स्वच्छता विषयक कामासाठी आवश्यक असलेले जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध होणे कामी गट क्र.अ) करिता मे.एस.आर.बी. इंडस्ट्रीज,सोलापुर,गट क्र.ब) करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी व मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण,गट क्र.क) करिता मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेश,कल्याण,मे.श्रीराम ॲग्रो एजन्सीज, अमरावती व गट क्र.ड) करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी, मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण यांनी प्रति किलो व लिटर करिता सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ करिता सादर केलेल्या दरास व निविदाकारास मा.स्थायी समितीची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मान्यता मिळणे आवश्यक होती.परंतु मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

दि.२८/०२ /२०२४

**प्रशासकिय ठराव क्र.** ३६५

सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करिता स्वच्छता विषयक कामासाठी आवश्यक असलेले जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध होणे कामी गट क्र.अ)करिता मे.एस.आर.बी.इंडस्ट्रीज, सोलापुर, गट क्र.ब) करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी व मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण,गट क्र.क) करिता मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण,मे.श्रीराम ॲग्रो एजन्सीज, अमरावती व गट क्र.ड) करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी, मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण यांनी प्रति किलो व लिटर करिता सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ करिता सादर केलेल्या दरास व निविदाकारास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करिता स्वच्छता विषयक कामासाठी आवश्यक असलेले जंतुनाशके, किटकनाशके, अळीनाशके,डासनाशके व दुर्गधीनाशके उपलब्ध होणे कामी गट क्र.अ)करिता मे.एस.आर.बी.इंडस्ट्रीज, सोलापुर,गट क्र.ब) करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी व मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण,गट क्र.क) करिता मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण,मे.श्रीराम ॲग्रो एजन्सीज, अमरावती व गट क्र.ड) करिता मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी, मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन,कल्याण यांनी प्रति किलो व लिटरसाठी सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ करिता सादर केलेल्या कमी दराचे बाबवार निविदाकारांशी संविदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देत असुन सदर निविदेची मुदत कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासुन पुढील दोन वर्ष कालावधी करिता मंजुरी देण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**